पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५०८/२०१७
दिनांक - ०२/०३/२०१७

प्रति,

मा................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिका -
सार्वत्रिक निवडणूकी नंतरची पहिली महापालिका सभा (विशेष बैठक)
दिनांक **१४/०३/२०१७** रोजी सकाळी **११.००** वा. आयोजित केलेबाबत...

माननीय महोदय / महोदया,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्र.१ (ब) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ मधील नियम क्र.३(२) अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पहिली महापालिका सभा (विशेष बैठक) मंगळवार दिनांक **१४/०३/२०१७** रोजी सकाळी **११.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात भरणार आहे. सोबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पहिल्या महापालिका सभेची (विशेष बैठकीची) कार्यपत्रिका जोडली आहे. सदर सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

\\Nagersachiv1\Election_2017\Mayor_Dymayor\Agenda 01.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कामाकरीता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८.

## सूचना

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्र.१ (बी) (एच) (आय) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ मधील नियम क्र.३ (२) अन्वये)

## कार्यपत्रिका क्रमांक – ०१

मार्च २०१७

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्र.१ (ब) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे) नियम २००५ मधील नियम क्र.३ (२) अन्वये सार्वत्रिक निवडणूकीनंतरची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची पहिली महापालिका सभा (विशेष बैठक) मंगळवार दिनांक **१४ मार्च २०१७** या दिवशी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात भरेल.

सदर सभेत खालील कामकाज होईल.

## निवडणूका

विषय क्र.०१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १९ (१) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे **मा.महापौर व मा.उपमहापौर** यांची निवड मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणूका घेणे ) नियम २००५ प्रमाणे करणे.

(टिप – १) महाराष्ट्र महानगरपालिका (महापौर पदाचे आरक्षण) नियम २००६ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे मा.महापौर पद **“ नागरिकांचा मागास प्रवर्ग ”** करिता राखीव ठेवलेले आहे.
२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदासाठी निवडणुका घेणे) नियम २००५ मधील नियम क्र.५ अन्वये “ मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड करण्यासाठी बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल,”)

## नियुक्त्या

विषय क्र.०२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (२) मध्ये तरतुद केल्याप्रमाणे स्थायी समितीवर १६ (सोळा) मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतुद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करणे.

विषय क्र.०३)महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३० अन्वये व पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६७ मध्ये निर्देष केल्याप्रमाणे खालील ४ (चार) विशेष समित्या नेमणे –

१) विधी समिती –
(टिप – विधी समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत. )

२) महिला व बालकल्याण समिती -
अ) महिला व बालकल्याण समितीवर २ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करणे.
ब) महिला व बालकल्याण समितीवर ७ मा.महिला सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

३) शहर सुधारणा समिती -
( टिप – शहर सुधारणा समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत. )

४) क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती -
(टिप – क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीवर ९ मा.सदस्यांच्या नियुक्त्या करावयाच्या आहेत. )

( टिप – उपरोक्त क्र.१ ते ४ प्रमाणेच्या विशेष समित्यांच्या मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देऊन नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या आहेत.)

**( उल्हास बबनराव जगताप )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५०८/२०१७
दिनांक : ०२/०३/२०१७

(टिप – प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांचे कार्यालयात वाचण्यासाठी ठेवणेत आलेली आहेत.)